**का.नु.भ. अर्ज क्र.६१/सी–१४/२०१७**
**निशाणी क्रं. यू–१५**

**वि.प.क्र.२ तर्फे ॲड. श्रीमती.एन.डी.जोशी यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

अपघातानंतर माझे लग्न झाले. घरी मी एकत्रीत कुटूंबात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे कुटूंबाचा सांभाळ करतो. अपघातादिवशी गुजरातहुन कोल्हापूरकडे येत होतो. अपघात रात्री १.४५ वाजता झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी ट्रकच्या डाव्या बाजूला बसलो होतो त्यावेळेस दोन ते तीन व्यक्ती येवून खालून दगड मारल्यामुळे काच फुटून तो माझे डोक्याला लागला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रकची काच दगड मारल्यानंतर फुटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे डोक्याला अपघातामुळे मार लागला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दगड मारल्यामुळे मला १०० टक्के अपंगत्व आले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी हॉस्पीटलमध्ये माझेवर ऑपरेशन करण्यात आले नाही. सिटी हॉस्पीटलमध्ये उपचार करणा–या डॉक्टरांचे नाव सांगता येत नाही. सिटी हॉस्पीटलमध्ये उपचार करणा–या डॉक्टरांनी डॉ. तगारे यांच्याकडे उपचारासाठी जाण्यास सांगितले नव्हते याबाबत मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, औषधोपचारासाठी मला रू. ७०,०००/– खर्च आला असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ट्रकमध्ये प्रवासी म्हणून प्रवास करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी विप क्र. १ कडे क्लिनर म्हणून काम करीत होतो आणि मला दर महा रू. ८,०००/– पगार होता असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दर महा रू. ८,०००/– पगार होता याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विप क्र. १ कडे कामाला नव्हतो म्हणून तसा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे

नाही की, मी आजरोजी काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी कामधंदा करत नाही असे खोटे सांगत आहे. माझेकडे वयाचा दाखला असून तो दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी नुकसान भरपाई रकमेची अवास्तव मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

(के. बी. कामगौडा)

कोल्हापूर.
आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई तथा
दिनांक : २५/११/२०२५
न्यायाधीश, कामगार न्यायालय क्रं.२ कोल्हापूर.